**पोलीस आयुक्तालय**
**मिरा-भाईंदर, वसई-विरार**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दरोडा टाकुन सुपारीचा ट्रक लुटणाऱ्या टोळीला शिताफीने अटक

दिनांक १७/०२/२२ रोजी पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि.क्र. I १६२/२२ भा.द.वि.सं.कलम ३९७, ३६५, ३४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हयात आरोपीतांनी रु. ७४,७८,२५०/- किंमतीची १९.५ टन सुपारी व १६,०००/- रोख रक्कम दरोडा टाकुन चोरुन नेलेली होती.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हयाचे घटनास्थळी पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी भेट देऊन अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांची पथके तयार केली. सदर गुन्हयाचे तपासकामी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेतील युनिट क्र १, २, ३, मध्यवती गुन्हे शाखा व काशिमिरा, पेल्हार, विरार, माणिकपूर, पोलीस ठाण्यातील अधिकारी/अंमलदार यांनी संयुक्तरित्या कामगिरी करुन गुन्हयातील घटनास्थळाचे बाईकाईने निरीक्षण करुन तांत्रिक पुरावे हस्तगत केले. तसेच गुप्त बातमीदाराचे मार्फतीने संशयीतांबाबत कौशल्यपुर्वक माहिती काढली असता सदर गुन्हा करणारे इसम यांनी पजेरो गाडी वापरल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गाडीचा मुंबई पावेतो मागोवा घेतला. मुंबई येथील वनराई पोलीस स्टेशनच्या हददीतील हब मॉल येथील सार्वजनिक पार्कींग मध्ये सदर ट्रक मधील माल हा खाली करुन तो माल दुस-या एका कंटेनर मध्ये भरुन नेले असल्याचे निदर्शनास आले.

त्या अनुषंगाने अधिक चौकशी करुन संशयित अनिस व त्यानंतर कंटेनर चालक जयविर याचेबाबत माहिती घेतली असता जयविर रामस्वरुप हा सुरतहून पुन्हा मुंबईकडे येत असल्याचे समजल्याने त्यास खानीवले टोलनाका येथे सापळा लावून कंटेनरसह ताब्यात घेतले.

कंटेनर चालक जयविर रामस्वरुप याचेकडे केलेल्या सखोल तपासात त्याचा साथीदार सिध्दार्थ रमेश जन्मजेय रा. उल्हासनगर याचेबाबत माहिती प्राप्त झाली व तो पांढ-या रंगाची स्कोडा वापरत असुन त्यामधुन सुरत येथे गेलेला आहे अशीही माहिती प्राप्त झाली. सदरचा आरोपी हा सुरत येथे असल्याने तपास पथक सुरत येथे रवाना करुन सदर ठिकाणी स्थानिक पोलीसांच्या मदतीने सापळा रचुन १) सिध्दार्थ रमेश जन्मजय २) कौसीम फारुख खान ३) अत्तार मुस्तफा खान अशा तीन आरोपीत यांना ताब्यात घेऊन गुन्हयातील दरोडा टाकुन चोरुन नेलेली सुपारी हस्तगत करण्यात आलेली आहे.

**<u>आरोपी नामे</u>**

१) जयविर रामस्वरुप रा. मुजफ्फ़नगर, राज्य उत्तर प्रदेश

२) सिध्दार्थ रमेश जन्मजेय, वय. ४१ वर्ष, रा. उल्हासनगर

३) कौसिम फारुख खान, वय. २२ वर्ष, रा. मोतीनगर, मुंबई

४) अत्तार मुस्तफा खान, वय. २६ वर्ष, रा. मोतीनगर, मुंबई

यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने सदरील तपासामध्ये मध्ये कठोर मेहनत घेऊन सदर गुन्हयातील सराईत आरोपीत यांना अटक करुन सदरचा संवेदनशिल गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

**सदरील गुन्हयामध्ये पुढिल अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी अत्यंत कुशलतेने व मेहनतीने तपास करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.**

१) पो.निरी कुराडे, २) सहा.पो.निरी. टोकले, ३) पोउपनिरी सुर्वे, ४) पो.निरी. विचारे, सर्व नेम गुन्हे कक्ष-१, ५) पोनि शाहुराज रणवरे, ६) सपोनिरी रणजितसिंग परदेशी, सर्व नेम. गुन्हे कक्ष- २७) पो.नि/ प्रमोद बडाख, ८) पोउपनिरी/ शिवाजी खाडे, ९) पोउपनिरी/ उमेश भागवत, सर्व नेम.गुन्हे कक्ष-३ १०) पो. निरी राहुल राख ११) सपोनि अमोल आंबवणे, १२) सपोनि/दत्तात्रय सरक, १३) सपोनि/नितीन बेंद्रे, १४) पोउनि/कैलास सोनावणे सर्व नेम. मध्यवर्ती गुन्हे १५) पोउपनि/सनिल पाटील नेम. पेल्हार पो. ठाणे १६) सपोनि/प्रशांत गांगुर्डे नेम. काशिमीरा पो.ठा १७) सपोनि/ सचिन सानप, नेम. माणिकपुर पो. ठाणे १८) पोउपनि/ संदेश राणे १९) पोउपनि/ अभिजीत टेलर नेम. विरार पो.ठाणे २०) पोउपनि/सनिल पाटील, पेल्हार पो.ठाणे

**पोलीस अंमलदार-**

पो.हवा. गर्जे, २) पो.हवा. संजय शिंदे, ३) पो.ना. लांडगे, ४) पो.ना. सावंत, ५) पो.कॉ.विसपुते, ६) पोकॉ. राजपुत, ७) पोकॉ सुमीत जाधव, सर्व नेम. गुन्हे कक्ष-१, ८) पोहवा/१४९३ जनार्दन मते, ९) पोहवा/२७७३ मनोहर तावरे, १०) पोहवा/०००१६ विकास यादव, ११) पोना/१२१८ गोविंद केंद्रे, १२) पोना/१०३१ राजाराम काळे, १३) पोना/१६१० शिवाजी पाटील, १४) पोअं./०७१५४ प्रविणराज पवार, १५) पोअं/१८६७ महेश वेल्हे, १६) पोअं/३३७५ राजेश श्रीवास्तव, १७) पोअं/०७१११ सतिष जगताप, १८) पोअं./३५७९ सुशील पवार, १९) पोअं/९५९ संग्राम गायकवाड सर्व नेम. मध्यवर्ती कक्ष २०) पो हवा/१०७१रमेश भोसले, २१) पो हवा/ १०३२ संजय नवले. २२) पो हवा/१०६५ सचीन पाटील २३) पो हवा/५६२ चंदन मोरे, २४) पोहवा/७९३ महेश पागधरे , २५) पोना/१९०७ प्रशांतकुमार ठाकुर, २६) पोना/ १५९२ रमेश अलदर, २७) पोकॉ/१९४८ दादा आडके सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-२ २८) पो.हवा/ अशोक पाटील २९) पो.ना/ मनोज सकपाळ, ३०) पो.ना/ सचिन घेरे, ३१) पो.ना/ मुकेश तटकरे, ३२) पो.ना/ शंकर शिंदे, ३३) पो.ना/ मनोज चव्हाण, ३४) पो.ना. /सागर बारवकर, ३५) पो.अं./ राकेश पवार, ३६) पो.शि/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ ३७) पोशि /०७७१४१ हनुमंत थेरवे, ३८) पोशि/ ०८०११ समिर यादव, ३९) पोशि/ अनिल नानगरे सर्व नेम. काशिमीरा पो.स्टे ४०) पोहवा /०३०१० योगेश देशमुख, ४१) पोहवा/०६०१९ तुकाराम माने, ४२) पोना/०६०५३ तानाजी चव्हाण, ४३) पोना/०८००१ प्रताप पाचुंदे, ४४) पोअं/१००२८ संदीप शेळके, ४५) पोअं/१४०१० सचिन बळीद, ४६) पोअं/१४०११ बालाजी गायकवाड, ४७) पोअं/१३०२४ मोहसिन

दिवाण, ४८) पोअं/१४०५८ किरण आव्हाड, ४९) पोअं/१४०७६ रोशन पुरकर, सर्व नेमणुक पेल्हार पोलीस ठाणे ५०) पो.हवा. ०६००८/सचिन प्रकाश लोखंडे,(५१) पो.ना. ०८००९/हर्षद जनार्दन चव्हाण, (५२) पो.ना. १२०३४/संदिप लक्ष्मण शेरमाळे, (५३) पो.शि.१२०२३/इंद्रनिल बापुसाहेब पाटील, ५४) पो.शि१२००६/विशाल लक्ष्मण लोहार, (५५) पो.शि./१३०६४ सुनिल बाळासो पाटील, (५६) पो.शि./१३१२४ रवी प्रकाश वानखेडे, (५७) पो.शि. १४१७० सागर बाळासाहेब घुगरकर, (५८) पो.शि. १३०९४./युवराज राजेंद्र वाघमोडे, नेम. विरार पो.ठाणे.

सदरील गंभीर गुन्हयाचा तपास करतांना सुरुवातीला कोणताही धागादोरा नसतांना तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हा घडल्यापासून वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सातत्याने मेहनत करुन व अत्यंत कौशल्यपुर्वक तपास करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणुन यातील आरोपीतांना अटक केली असून गुन्हयातील चोरीस गेलेला माल हस्तगत केला आहे. सदरच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांनी तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे अभिनंदन करुन माहे फेब्रुवारी २०२२ मधील 'उत्कृष्ट गुन्हयाची उकल' म्हणून पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मासिक गुन्हे आढावा बैठकीचेवेळी प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून गौरविले आहे.

